# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २३–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. संगाप्पा चनबसू केसगोंड ,<br>मु. पो. उटगी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. संगाप्पा चनबसू केसगोंड , मु. पो. उटगी, ता. जत, जि. सांगली यांनी १५.६.२००९ रोजी रु. ५०/– प्रोसेसिंग फी भरुन शेतीपंपासाठी वीज पुरवठ्यासाठी अर्ज केला आहे. ग्राहकाने करावयाचे खर्चाचे चलन अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे १२.१.२०१० रोजी तक्रार करेपर्यंत दिलेले नव्हते त्यामुळे क्ष फॉर्मातील तक्रार दाखल केली आहे. ‘ क्ष ‘ फॉर्मातील निर्णय मान्य न झाल्याने दिनांक ११.२.२०१० ‘ अ ‘ फॉर्ममध्ये सीजीआरएफमध्ये तक्रार दाखल केली आहे. मंचाने तक्रार दाखल करुन घेवून पुढील कार्यवाही सुरु केली व त्या अनुषंगाने मुद्देनिहाय अभिप्राय मागविला. मुद्देनिहाय अभिप्राय प्राप्त झाल्यावर दिनांक २३.३.२०१० रोजी मंच कार्यालयात सुनावणी नक्की केली.

तथापि, वि.प.ने मार्च अंतापर्यंत वसुलीचे काम असल्याने मुदतवाढ मागितली तशी मंचाने ६.४.२०१० पर्यंत मुदतवाढ दिली. ६.४.२०१० चे सुनावणीवेळी वि.प.चे प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित होते.

माहे ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात मा. अध्यक्ष व ग्राहक सदस्य यांची पदें रिक्त असल्याने व तक्रार होण्याचे प्रमाण जास्त असल्याने सुनावणी नंतरही निर्णयास विलंब झाला आहे.

अंतर्गत कक्षाचा निर्णय, ग्राहकाची तक्रार, वि.प.चे म्हणणे, सुनावणी दरम्यानची कथने या सगळ्यांचा एकत्रित विचार करुन मंच खालील निष्कर्षाप्रत पोहोचला आहे.

ग्राहक तक्रारदार यांनी दि. १५.६.२००९ रोजी ५० रु. प्रोसेसिंग फी भरली आहे ही बाब बरोबर आहे. दि. १५.६.२००९ नंतर १ महिन्याच्या कालावधीत चलन देणे आवश्यक होते यामध्ये वि.प.ने कोणत्या स्थितीमध्ये विद्युत पुरवठा करावयाचा आहे याची नोंद देणे आवश्यक होते तथापि तशी नोंद नसल्याने वितरण मेन्सचा विस्तार या सदराखाली जोडणी गृहीत धरुन ३० दिवसांचे आंत चलन देणे योग्य व कायदेशीर आहे तसे वि.प.कडून कृत्य घडलेले नाही ही वस्तुस्थिती आहे.

वि.प.ने आपल्या मुद्देनिहाय अभिप्राय २९.३.२०१० रोजी चलन देण्यात आले असे नमूद केले आहे तथापि चलन पोच झाल्याची प्रत मंचात सादर केलेली नाही. दि. २९.३.२०१० या तारखेस प्रतिनिधींनी आक्षेप घेतला नसल्याने सदरच्या तारखेपर्यंत विलंब गृहीत धरुन १४.७.२००९ ते २९.३.२०१० हा ३७ आठवड्यांचा विलंब आहे त्यांस विनियमातील तरतुदीप्रमाणे परिशिष्ट अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आठवड्यास किंवा त्याच्या भागास रु. १००/– या प्रमाणे ३७x १०० = रु. ३७००/– रुपये भरपाई देण्यात यावी.

आदेश खालील प्रमाणे –

## आदेश

१) वर तपशिलात नोंद केल्याप्रमाणे ३७ आठवड्यांच्या विलंबासाठी प्रति आठवडा रु १००/– या प्रमाणे रु. ३७००/– भरपाई देण्यात यावी.

२) वरील रक्कम दोन बिलींग सायकलमध्ये समायोजन करुन उर्वरित रक्कम चेकने अथवा रोखीने द्यावी.

३) खर्चाबाबत आदेश नाही

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

5) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )

सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :